# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३६१/२०२४ दिनांक ०१/१०/२०२४

## प्रेस नोट

### "जबरी चोरी करणा-या आरोपीत यांना अटक करुन जबरी चोरीचा गुन्हा उघड करण्यास नायगाव गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश."

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दि.२२/०९/२४ रोजी ०३.०० वाजेच्या सुमारास, मुंबई- अहमदाबाद हायवे, मुंबई वाहिनीवर, बापाणे ब्रिजच्या जवळ असलेल्या, एनी टाईम फुड, हॉटेलजवळ, फिर्यादी व त्यांच्या सोबत असलेले अरमान व जयप्रकाश यांना चार अनोळखी इसमांनी लोखंडी रॉडच्या सहाय्याने मारहाण करुन, सदर मारहाणीमध्ये अरमान याचे उजव्या हाताचे हाड व डाव्या हाताचे अंगठयाचे हाड फ्रॅक्चर झाले तसेच फिर्यादी व फिर्यादी यांचे मित्र जयप्रकाश यास किरकोळ दुखापत झाली. तसेच त्यांनी फिर्यादी यांच्या गाडीचे नुकसान करुन जबरदस्तीने फिर्यादीच्या कारमधील १३०००/- रुपये रोख रक्कम तसेच जयप्रकाश याचा विवो कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने त्यांना मारहाण करुन चोरुन घेवून गेले. सदर मारहाणी दरम्यान फिर्यादी यांची गळयातील २.५ तोळयाची सोन्याची चैन कुठेतरी गहाळ झाल्याने फिर्यादी यांनी नायगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ४६०/२०२४ बी.एन.एस. ॲक्ट कायदा कलम ३०९(६), ११८(२), ३२४(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच गुन्हा घडलेल्या घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज नसल्याने सदर गुन्हा उघडकीस आणणे एक कसोटी होती परंतु मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेच्या अनुशंगाने नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या वेगवेगळया टीम बनवून मुंबई -अहमदाबाद हायवे तसेच आजुबाजुच्या परिसरातील १०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज व गुप्तबातमीव्दार मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे सदरचा गुन्हा हा आरोपीत नामे १) नाजीम रफीक सिध्दकी, वय-३३ वर्षे राहणार- मनोर ता.मनोर जि.पालघर, २) उजेफा अश्रफ शेख, वय-२२ वर्षे, राहणार-सातिवली, ता.मनोर जि.पालघर ३) कुमार ऊर्फे कल्पेश रमाकांत भोईर वय-३२ वर्षे, राहणार-मु.जांभुलपाडा, पोस्ट भातानेता. वसई जि. पालघर ता.मनोर यांनी केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हयाची कबुली दिल्याने सदर आरोपीत यांना सदरच्या गुन्हयात अटक करुन त्यांनी गुन्हा करीत असताना वापरलेले १०,००,०००/- रुपये किंमतीची इनोव्हा वाहन गुन्हयाच्या तपासकामी जप्त करण्यात आले आहे.

वरील कामगीरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, श्रीमती पौर्णिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/रोशन देवरे, सपोनि/गणेश केकान, पो.अंम. सचिन ओलेकर, सचिन मोहीते, सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, पाडुंरंग महाले यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

-----ooo-----